# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २९/०४/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. काटोल** :—अंतर्गत ०१ कि. मी अंतरावर अन्नाभाउ साठे नगर काटोल येथे दिनांक २८/४/२२ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बंडु रामचंद्र गायकवाड वय ४२ वर्ष रा. अन्नाभाउ साठे नगर, काटोल यांचा पुतन्या राहुल श्रावण गायकवाड(जखमी/मृतक), वय २७ वर्ष रा. अन्नाभाउ साठे नगर, काटोल व विधीसंघर्ष बालक वय १२ वर्ष हे मोहल्यात लग्न असल्याने त्या लग्नामध्ये नाचत असतांना त्यांच्यात आपसात वाद झाला. या वादामध्ये विधीसंघर्षीत बालक याने राहुल गायकवाड याच्या छातीवर चाकुने मारहाण करून जखमी केले.

सदर गुन्हयातील जखमी नामे राहुल श्रावण गायकवाड वय २७ वर्ष रा. अन्नाभाउ साठे नगर काटोल हा मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचाराकामी भरती होता. दि. २९/०४/२२ रोजी ०२.३० वा. उपचारा दरम्यान मरण पावला. मेयो पोलीस बुथ नागपुर ग्रामीण येथुन दि २९/०४/२२ रोजी सुचना प्राप्त झाल्याने सदर गुन्हयात कलम ३०२ भादवी प्रमाणे कलम वाढ करण्यात आली आहे

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे विधीसंघर्ष बालक विरुध्द कलम ३०२, ३२६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री परमेश्वर आगासे मो.नं. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. मौदा**:— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील रॉयल कॉलनी कालीमाता मंदीर जवळ मौदा येथे दिनांक २८/०४/२२ चे २१.३० वा. ते २९/०४/२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— विक्की ज्ञानेश्वर साठवणे, वय ३४ वर्ष, रा. रॉयल कॉलनी कालीमाता मंदीर जवळ मौदा यांच्या राहत्या घराच्या समोरील दाराचा अज्ञात आरोपीने कोंडा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घरातील बेडरूम मधील लोखंडी आलमारीतील लॉकर तोडुन लॉकरमधील सोन्या—चांदीचे दागिने कि. १,८०,०००/—रु. व नगदी ८०,०००/—रु. असा एकुण कि. २,६०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम मो.क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर